# मानसकन्या ठरलेल्या मनीषा मुसळे-माने हिनेच देवमाणूस डॉ. वळसंगकरांचा घात केल्याचा बोलबाला

सोलापूर/खास प्रतिनिधी

जिला शाळा-कॉलेज शिक्षणाच्या टप्प्यावर सर्वसामान्य गोरगरीब घराण्यातील मुलगी म्हणून हॉस्पीटलमध्ये नोकरीला घेतलं. आयुष्यात सगळ्या आघाड्यांवर उभा केलं. हॉस्पीटलमधील येथील सगळे व्यवहार तिच्या ताब्यात दिले. मानसकन्या म्हणून तिच्यावर विश्वास ठेवत हॉस्पीटलचं प्रशासन अधिकारी हे मुख्य पद दिलं. येथील तिजोरीच्या चाव्यासुद्धा तिच्याच हाती सोपविल्या. ती म्हणेल ती पुर्वदिशा असं सगळं तिच्याबाबतीत होतं. सोलापुरातील प्रसिद्ध डॉ.वळसंगकर हॉस्पीटलमधील प्रशासन अधिकारी मनीषा मुसळे-माने हिने जगभरातील मेंदू रुग्णांसाठी देवमाणूस ठरलेल्या डॉ. शिरीष वळसंगकरांचा घात केला. खरं घात हा शब्दसुद्धा फिका पडेल असं तिनं केलं. देवमाणसाला या जगातून कायमचं घालवलं, अशा प्रतिक्रिया डॉ. वळसंगकरांच्या मृत्यू प्रकरणाला जबाबदार असल्याबद्दल जेव्हा संशयित मनीषा हिचे नाव पुढे आले, त्यानंतर हॉस्पीटलमधील सर्व कर्मचाऱ्यांसह शिरीष सरांचे नातेवाईक यांच्याकडून प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.

दरम्यान, डॉ. वळसंगकरांना आत्महत्येस प्रवृत्त केल्याबद्दल जेव्हा त्यांच्या हॉस्पीटलमधील मनिषा माने हिचं नाव समोर आलं तेव्हा महाराष्ट्र हादरवलेलं वळसंगकर आत्महत्याप्रकरण अत्यंत अनपेक्षित वळणावर पोचलं. मनीषाच्या धमक्यांनी त्रस्त झालेल्या हळव्या मनाच्या शिरीष सरांनी अखेर जगाचा निरोप घेतला, असा सर्वत्र बोलबाला आहे.

## महाराष्ट्र हादरवलेलं वळसंगकर आत्महत्याप्रकरण पोहोचले अत्यंत अनपेक्षित वळणावर

## मनीषाच्या धमक्यांनी त्रस्त झालेल्या हळव्या मनाच्या शिरीष सरांनी अखेर घेतला जगाचा निरोप

### धमक्यांनी चर्चा कर्मचाऱ्यांमध्ये, मेलचा सुद्धा सापडला पुरावा

डॉ. वळसंगकर यांना हॉस्पिटलमधून बेदखल करण्यात आल्यानंतर मनीषा माने हिलासुद्धा काढून टाकण्यात येत असल्याची कुणकुण लागल्यापासून तिने डॉ. शिरीष वळसंगकर यांना मी इतकी वर्षे हॉस्पिटलमध्ये काम केले,मला दोन आपत्य आहेत,माझ्या कुटुंबाचे पुढे कसे होणार? मला कामावरून काढल्यास मी आत्महत्या करेन, अशा तिने धमक्या तिने दिल्याची चर्चा हॉस्पीटलमधील कर्मचाऱ्यांमध्ये आहे, शिवाय तिने तसा मेलदेखील डॉक्टरांना पाठवल्याचा पुरावा समोर आला आहे.




सोलापूर : शिरीष सरांच्या आत्महत्येला प्रशासन अधिकारी मनीषा मुसळे-माने ही कारणीभूत ठरल्याची माहिती समोर आल्यानंतर रामवाडी परिसरातील हेच ते धक्का बसलेले डॉ. वळसंगकर हॉस्पीटल. ज्यामधील कर्मचाऱ्यांमध्ये उडाली एकच खळबळ.

### मनीषा मुसळे-माने हिच्या पोलीस कोठडीसाठी पोलिसांनी न्यायालयात सांगितलेली आठ कारणे

- डॉ. वळसंगकरांना धमकी दिलेल्या ई-मेलची मुळ प्रत करायची आहे जप्त
- आढळून आलेल्या चिठ्ठीसंबंधी तपास करायचा आहे
- चिठ्ठीच्या पार्श्वभूमीवर, हस्ताक्षराचे नमुने घेऊन ते तपासाला आहेत पाठवायचे
- डॉ. वळसंगकरांना महिलेने कशा प्रकारे दिला त्रास त्याबद्दल करायचा आहे तपास
- संशयित मनीषा हिने लिहून दिलेल्या माफीनाम्याच्या अनुषंगाने, मिळवायची आहेत अधिक माहिती
- प्रख्यात डॉक्टरांच्या आत्महत्येचे प्रकरण सामाजिकदृष्ट्या अत्यंत सवंदेशील असल्याने करायचा आहे सुक्ष्म तपास
- डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती सांगता मिरवणूक असल्याने पोलीस यंत्रणा बंदोबस्तात आहे, त्यामुळे कोठडी घेऊन परत करता येईल तपास
- डॉ.वळसंगकरांच्या आत्महत्येला संशयित मनिषा हिच्याशिवाय जबाबदार अन्य कोणी आहेत का?

### मनीषा मुसळे-माने हिची पोलिस कोठडी टाळण्यासाठी विधीज्ञांनी केलेल्या युक्तीवादाचे मुद्दे

- डॉक्टरसाहेब हे प्रख्यात मेंदू विकार तज्ज्ञ होते, एखाद्या कर्मचाऱ्याने पगार कमी केला असे सांगणे आणि त्यातून आत्महत्या करणे असे नाही होऊ शकत
- डॉ. वळसंगकरांच्या आत्महत्येसंबंधी वस्तुस्थिती वेगळी आहे, ती बाहेर येऊ नये, ती लपविण्याच्या कारणासाठी खोटी केस संशयित मनीषा मुसळे-माने या आशिलावर करण्याचा प्रकार
- पाठवलेली चिठ्ठी मेलवर आहे, त्यामुळे हस्ताक्षराचा संबंध येत नाही
- चिठ्ठी फाडली ती त्यांच्या दवाखान्यात फाडली, तेव्हा आता चिठ्ठीचा संबंध येतो कशाला?
- मनीषा यांच्या पोलीस कोठडीसाठी एकही कारण गरजेचे आहे असे दिसत नाही, पोलीस कोठडी मागण्याची नाही गरज

### शिरीष सरांच्या आत्महत्येनंतर उपस्थित झालेले अत्यंत महत्त्वाचे मुद्दे...

- शिरीष सरांना दैनंदिनी लिहण्याची सवय होती, या दैनंदिनी लिहण्याच्या डायऱ्या पोलिसांनी ताब्यात घेतल्या तर बरीच महत्वाची मिळू शकते माहिती
- चिठ्ठी समोर आली असली तरी हॉस्पीटलच्या व्यवहारांमधून त्यांना बेदखल का करण्यात आलं होतं?
- कुठलीही नोंद न ठेवता हॉस्पीटलमध्ये रुग्णांकडून पैसे घेतले जात होते का?
- नोंद न करता परस्पर रुग्णांकडून परस्पर पैसे घेण्याची बाब डॉ. वळसंगकरांना मान्य नव्हती, पण कोणाच्या सांगण्यावरुन तसा प्रकार होता सुरु?
- मनीषा मुसळे-माने ही महिला शिरीष सरांना कशाप्रकारे धमक्या आणि त्रास देत होती?
- त्रास देण्यास भाग पाडणारा तिचा बोलविता धनी कोण होता का?
- मनीषा त्रास देत असताना डॉ. वळसंगकरांनी पोलिसांत तक्रार का दिली नाही
- आर्थिक गैरव्यवहाराच्या कारणातुन शिरीष सरांनी मनिषाला कामावरुन काढून टाकलं होतं हे त्यांच्या कुंटुंबातील सदस्यांना खटलं होत का? त्यावरुन कुंटुंबातील सदस्यांमध्ये वाद होत होता का?

## ‘देवमाणसा’ला कायमचे संपविण्याला जबाबदार संशयित मनीषा मुसळे-माने अशी आहे तरी कोण?



सोलापूर : जगभरातील मेंदू रुग्णांसाठी देवमाणूस ठरलेला हळव्या मनाचा हाच तो चेहरा जो महिलेच्या धमक्यांना घाबरून अक्षरश: जग सोडून गेला.

- मनीषा मुसळे-माने ही मरीआई चौकातील गवळी वस्ती तालीम येथील मुळ रहिवाशी, स्व. सुरेश निंबाळकरांचे मोठे बंधू आणि गिरणी कामगार तसेच व्यवसायाने गवळी असलेले हरिभाऊ निंबाळकर यांची आहे कन्या
- मनीषा हिला आहेत दोन सख्खे भाऊ
- मनीषाचा विवाह सर्वप्रथम मुसळे नामक व्यक्तीशी झाला होता
- मात्र पतीला दारूचे व्यसन असल्याने मनीषा हिने त्याला सोडून माने नामक व्यक्तीशी दुसरा विवाह केला
- पहिले पती मुसळे यांच्यापासून मनीषा हिस दोन मुले आहेत
- मुलीने दुसरा विवाह केल्यामुळे निंबाळकर कुटुंबीय तिच्याशी बोलत नव्हते
- काही वर्षांपूर्वी हरिभाऊ निंबाळकर यांचे निधन झाले
- त्यावेळी मनीषा ही वडिलाचे अंत्यदर्शन घेण्यासाठी तिच्या भावांनी तिला तिथे येण्यापासून मज्जा केला होता
- मात्र मनीषा हिने चिडून तिसऱ्या दिवशीचा विधी स्वतःच उरकून वडिलाप्रती आपली भावना व्यक्त केली होती
- याचीही चर्चा मोठ्या प्रमाणावर झाली होती
- शाळा-कॉलेजला असतानाच मनीषा ही वळसंगकरांच्या दवाखान्यामध्ये कामाला लागली होती
- कालांतराने डॉक्टर वळसंगकर यांच्या घरातली ती मेंबर बनली
- हॉस्पिटलमध्ये बघता बघता टॉपवर गेली
- डॉ. वळसंगकरानंतर मनीषा हिचाच हॉस्पिटलमध्ये वट्ट चालत होता
- डॉक्टर वगळता अन्य कर्मचारी स्टाफसुद्धा तिला टरकून होता
- तिचे इतके प्रस्थ होते की तिच्याशिवाय हॉस्पिटलमध्ये काडीसुद्धा हलत नव्हती, अशी परिस्थिती होती
- सामान्य घरातून आलेली आणि जवळपास २० ते २५ वर्षे हॉस्पिटलमध्ये कामकाज बघून तिला दिले गेले होते प्रमुख पद
- मनीषा हिचा बंगला पाहिल्यानंतर डोळे दिपल्याशिवाय राहत नाहीत अशी चर्चा
- डॉक्टरांची जणू ती एक मानसकन्या असल्याची कर्मचाऱ्यात चर्चा आहे.



सोलापूर : डॉ. वळसंगकरांच्या आत्महत्या प्रकरणातील संशयित मनिषा मुसळे-माने हिला न्यायालयात नेताना.

## संक्षिप्त वृत्त

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज जिल्हा दौऱ्यावर



**सोलापूर** : राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सोमवार दि. २१ एप्रिल २०२५ रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. उपमुख्यमंत्री शिंदे यांचे सोमवार दि.२१ एप्रिल २०२५ रोजी दुपारी १२ वाजता दरे हेलिपॅड येथून शासकीय हेलिकॉप्टरने माढ्याकडे येणार आहेत. दुपारी १२.४५ वा. माढा येथे आगमन व मोटारीने शेटफळ रोडकडे प्रयाण. दुपारी १ वाजता राजीव ग्रो ऑईल इंडस्ट्रीज प्रा. लि भूमिपुजन सोहळ्यास उपस्थिती. दुपारी १.३० वा. शिवसेना पक्षाची जाही सभा व मेळाव्यास उपस्थिती. ३ वाजता हेलिकॉप्टरने सोलापूर विमानतळा कडे प्रयाण. दुपारी ३.३० वा सोलापूर विमानतळ येथे आगमन व शासकीय विमानाने मुंबई कडे प्रयाण असा त्यांचा दौरा आहे.

### क्रिकेटच्या कारणावरून बॅट आणि स्टम्पने मारहाण; तरुण जखमी

**सोलापूर** : क्रिकेट खेळण्याच्या वादातून बॅट, स्टंप आणि दगडाने केलेल्या मारहाणी तरुण जखमी झाला. ही घटना अक्कलकोट येथील कांदा बाजार येथे शनिवारी सायंकाळच्या सुमारास घडली. जैद करीम अरब (वय २२ रा.अरब गल्ली अक्कलकोट) असे जखमी तरुणाचे नाव आहे. त्याला अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून मोहिद (भाऊ ) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. शनिवारी सायंकाळी सहाच्या सुमारास कांदा बाजार येथे क्रिकेट खेळत असताना वाद झाला होता. त्यावेळी महबूब बागवान,अजहर बागवान, कय्युम बागवान आणि मुजम्मिल बागवान यांनी मिळून त्याला मारहाण केली. याची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

### विवाहितेचा हुंड्यासाठी मानसिक व शारीरिक छळ

**सोलापूर** : विवाहिता ही सासरी नांदत असताना सासरकडच्या मंडळींनी पैशासाठी वेळोवेळी शिवीगाळ करून मारहाण केली. याप्रकरणी सासरच्या मंडळींवर विजापूर नाका पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना ९ जुलै २०२३ ते आजतागायत पर्यंत फिर्यादी यांच्या सासरी पुणे येथे घडली. प्राजक्ता सोमनाथ प्रक्षाने (वय-२५,रा. जिल्हा परिषद शाळेजवळ हडपसर,पुणे) यांच्या फिर्यादीवरून पती सोमनाथ, सासू शोभा,ननंद राधिका गायकवाड,आम्रपाली,रामा,पतीचा मामा भाऊराव व पतीचे मावस बहीण मनीषा,महेश लोखंडे,अनिता शिंदे (राहणार पंढरपूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस हवालदार जाधव हे करीत आहेत.

# सोलापूर बाजार समितीच्या प्रचाराला आला वेग गाव अन् घरभेटीने वातावरण निघतेय ढवळून

## ‘सांगा..सांगा.. कधी अन् कुठे येऊ द्या’ असा मोबाईलचा संवाद खूप जातोय काही सांगून

## भाजप, काँग्रेससह अन्य प्रमुख पक्षांच्या नेतेमंडळींबरोबरच पॅनलच्या प्रमुखांसह उमेदवारांनी पायाला बांधली भिंगरी

सोलापूर/प्रतिनिधी

बहुचर्चित सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूकींची रणधुमाळी जोरदारपणे सुरू आहे. सोलापूर जिल्ह्यातील अनेक नेते निवडणुकींमध्ये उतरले आहेत. या लक्षवेधी निवडणुकींकडे अवघ्या जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. या निवडणुकीच्या प्रचाराला वेग आला आहे.गाव अन् घरभेटीने वातावरण अक्षरश: ढवळून निघत आहे. दोन पॅनलच्या प्रमुखांसह उमेदवारांनी पायला भिंगरी बांधली आहे. यामध्ये भाजप, काँग्रेसह इतर प्रमुख पक्षांच्या नेतेमंडळींचादेखील समावेश आहे.

विशेषत्वे, मतदारांमध्ये ‘सांगा..सांगा.. कधी अन् कुठे येऊ द्या’ असा मोबाईलवर संवाद होत आहे, तो संवाद खूप जातोय काही सांगून जात असल्याची चर्चा निवडणुकींच्या धामधुमीत उठली आहे.

सोलापूर बाजार समितीची निवडणूक आणि मतदान प्रकिया काही ठराविक नियम व धोरण नुसार चालत असले तरी देखील शेतकरी व शेती उत्पादन व उत्पन्न यावर आधारित विविध अडचणीचा आधार घेऊन निवडणूक लढवली जात आहे.यंदाच्या निवडणुकींमध्ये आमदार विरुद्ध आमदार असा सरळ थेट निवडणूक होत आहे. शेती व शेतकरी हा विषय ध्यानात घेत शेतकरी विकास व शेतकरी परिवर्तन पॅनलची निर्मिती करण्यात आली आहे.

एकूण ७० उमेदवार उडी घेतली असली तरी देखील खरी लढत माजी आमदार व विद्यमान आमदार यांच्या मध्येच दिसून येत आहे.पॅनल गठीत करताना माजी व अनुभवी संचालक मंडळना सोबत घेऊन एक पॅनल तर पॅनल मध्ये नाही घेतले, विश्वासात नाही घेतले म्हणून जिद्दीने दुसरा पॅनल तयार करण्यात आला असला तरी देखील सोसायटी व ग्रामपंचायत मतदारसंघ हा उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर मध्ये समाविष्ट असून याचा मतदार हा ग्रामपंचायत,सोसायटी मधील पदाधिकारी तर व्यापारी संघातील व्यापारी, हमाल तोलार मध्ये काम करणारे हमाल तोलार यांच्या कार्यकसेत्रात काम करताना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी, विविध योजनेचा लाभ मिळावा म्हणून स्थानिक स्तरांवर मतदार असतात.यामुळे व्यापारी व हमाल तोलार याना कुठेही जाण्याची गरज चर्चा अंती मतदान वळविण्याचा प्रयत्न केला जाऊन जास्तीत जास्त विश्वास निर्माण करून मतदान कसे पदरात पडेल हेच विचार केला जातो.


सोसायटी मधील पदाधिकारी व सदस्य ,ग्रामपंचायत मधील सरपंच, उपसरपंच व सदस्य यांचे प्रत्यक्ष भेटी घेऊनच आवाहन करण्यासाठी उमेदवार जाताना दिसत आहे.दोन्ही पॅनल मधील उमेदवार हुशार अनुभवी आहेत.उत्तर व दक्षिण मधील नेते, शेतकरी,सोसायटी व ग्रामपंचायत यांचे वर्चस्व आहे.याच्या जोरावरच ह्या निवडणूक मध्ये शेतकरी विकास पॅनल मधून माजी सभापती दिलीप माने,काँग्रेसचे उपाध्यक्ष सुरेश हसापुरे,माजी संचालक अविनाश मार्तंडे,श्रीशैल नरोळे आदी तर परिवर्तन मधून आमदार पुत्र मनीष देशमुख,चिवडशेट्टी, हविनाळे इतर नेते मैदानात आहेत.मतदान साठी सहा दिवस शिल्लक असून उमेदवार प्रचारास सुरुवात केली आहे.मात्र सर्व मतदार कडे आधुनिक असे साहित्य उपलब्ध नसल्याने काही वेळा जबाबदारी सोपवून तर काही वेळेस प्रत्यक्ष भेटी घेणे जरुरी असल्याने सर्व उमेदवार पायात भिंगरी बांधली आहे. गावातील जेष्ठ नामवंत मान्यवर यांची गृहभेटी सुरू करण्यात आली आहे.काहीही अडचणी असुद्या सोडविण्यासाठी कटिबद्ध आहे असे आश्वासन दिले जात आहे.

आमदार सचिन कल्यांशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली माजी आमदार दिलीप माने,काँग्रेस उपाध्यक्ष सुरेश हसापुरे,उपसभापती श्रीशेल नरोळे, माजी सभापती राजशेखर शिवदारे यांचा दांडगा अनुभव,अडचणींची जाणीव विविध कल्याणकारी योजना यशस्वी पणे राबविण्यात आलेला अनुभव पदरी आहे.




### माने अन् हसापुरेंचे उत्तर, दक्षिणमध्ये मोठे बलस्थान

उत्तर मधील दिलीप माने यांच्याकडे ३६ ग्रामपंचायत व सोसायटी मध्ये ६५ ते ७० वर वर्चस्व आहे ,दक्षिण मधील सुरेश हसापुरे यांच्या वर्चस्वाखालील सोसायटी व ग्रामपंचायतची संख्या जास्त असून ती ५५ ते ६० आहेत.या दोघाना शह देण्यासाठी परिवर्तन पॅनल मधून आमदार पुत्र मनीष देशमुख, रामपा चिवडशेट्टी,हविनाळे,शेळके हे मैदानात उतरले आहे..



### नवख्या उमेदवाराचा लागणार कस

सोलापूर बाजार समिती निवडणूकही अत्यन्त चुरशीची होणार आहे.अनुभवी उमेदवार हे परिचित असून नवखे उमेदवाराची मात्र गोची होणार आहे.आपला चेहरा,ओळख,मतदान पदरी पाडून घेण्यासाठी आश्वासन, वारसा असे मुद्दे, व इतर प्रश्नांची तडजोड करावी लागणार आहे.